ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतीय सेवा क्षेत्रामध्ये 'नील अर्थव्यवस्थेचे' योगदान : एक विवेचन

प्रा. डॉ. कैलास जाधव[1], घोडके वैशाली महेंद्र[2]

*Corresponding Author:* प्रा. डॉ. कैलास जाधव

DOI - 10.5281/zenodo.14875067

***गोषवारा:***

*भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवाक्षेत्र हे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात याचे मोठे योगदान आहे. या सेवा क्षेत्रामध्ये विमा कंपन्या , बँका,वित्त, पर्यटन, आरोग्य शिक्षण ,दळणवळण इत्यादींचा समावेश होतो. सेवा क्षेत्र याची महत्त्वपूर्ण भूमिका भारतीय अर्थव्यवस्थेत दिसून येते. रोजगार निर्मिती,नवनवीन तंत्रज्ञानाद्वारे नवीन उत्पादने तयार करणे,इतर उद्योगांना सेवा पुरवून त्यांचा विकास करण्याचे काम या क्षेत्रातून सातत्याने होताना दिसत आहे. परंतु आज देशातील वाढत्या लोकसंख्येमुळे , गरिबी, यामुळे सेवा क्षेत्रामधून देशातील रोजगार अन्न सुरक्षितता इ. पूर्ण होतीलच असे होत नाही.*

*सेवा क्षेत्रातील संसाधने वाढली नाही तर देशाचा आर्थिक विकास कसा साधला जाईल, यासाठी अर्थतज्ञ हे वेळोवेळी नवीन क्षेत्रांचा समावेश असावा असे सांगतात. यामध्ये अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्र (शेती, पशुसंवर्धन, वनीकरण) द्वितीय क्षेत्र (उद्योग क्षेत्र, उत्पादन, बांधकाम इत्यादी) याबरोबरच प्रत्यक्ष क्षेत्र म्हणून सेवा क्षेत्राचा विचार केला जातो. आज आजमितीला या क्षेत्रांवर अर्थव्यवस्थेमध्ये चतुर्थ क्षेत्र (संशोधन व कौशल्याधारित ज्ञान)पंचकक्षेत्र (प्रशासन,प्रशिक्षण धोरणे ठरविणे.)इ.समाविष्ट आहेत.*

*तंत्रज्ञानाद्वारे इतरही क्षेत्र रूपांतरित होत आहे. यामध्ये ग्रीन अर्थव्यवस्था , एक डिजिटल अर्थव्यवस्था, अंतरिक्ष अर्थव्यवस्था इत्यादी अर्थव्यवस्था या विकसित होऊ लागले आहेत.*

*अशाच प्रकारच्या अर्थव्यवस्था या निर्माण होत आहेत त्यामुळे सर्वच क्षेत्रांचा विकास होणे गरजेचे आहे ,यामध्ये समुद्रक्षेत्रात मानव पूर्वीपासून अवलंबलेला आहे ,सागरी संसाधनाचा उपयोग करत आहे ,परंतु आज लोकसंख्या वाढीमुळे अर्थव्यवस्थेवर काही प्रमाणात भार पडताना दिसतो. त्याबरोबरच वैश्विकदृष्ट्या सर्व देश एकमेकां जवळ येत आहे.*

*जगातील बरेच देश हे सागरी किनाऱ्यावर वसलेले आहेत . त्यांना सागरी संसाधनांचा देखील फायदा होत आहे. काही देशांच्या आजूबाजूला जरी फक्त जमीन असती तरी त्यांना सागरी मार्गानेच व्यापार करावा लागत आहे. उदा. उझबेकिस्तान,अफगाणिस्तान, कझाकीस्तान.*

*या संशोधन पेपर मध्ये भारतीय सेवा क्षेत्रात ब्ल्यू इकॉनोमी /नील अर्थव्यवस्थेचे योगदान, तसेच या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असलेले उद्योग मत्स्यपालन, समुद्री पर्यटन इत्यादींचा सेवाक्षेत्र समावेश होऊन त्याचा फायदा विकसित व विकसनशील देशांना होऊन त्यांचा विकास साधला जात आहे. याविषयी अभ्यास केला आहे.*

***कीवर्ड-ब्ल्यू इकॉनोमी, सागरी मत्स्यपालन, सागरी वाहतूक, सागरी पर्यटन.***

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात प्रत्येक देशाच्या विकासासाठी त्या देशातील सेवा क्षेत्रामध्ये असणारी विविध क्षेत्र बँक, विमा, दळणवळण व्यवस्था, तंत्रज्ञान इ.येतात. या सेवा क्षेत्रामध्ये मध्ये आज सागरी क्षेत्रातील असणाऱ्या मत्स व्यवसाय, सागरी वाहतूक ,पर्यटन तसेच समुद्रतटीय क्षेत्रातील उद्योजकता इत्यादींचा समावेश होतो.

भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राच्या विकासासाठी नील अर्थव्यवस्था हा महत्त्वाचा स्तंभ ठरत आहे.यामध्ये आजच्या काळातील सागरी महाक्षेत्रात असणाऱ्या विविध व्यवसायांचा नीलअर्थव्यवस्था म्हणून समावेश होतो. प्रत्येक देशाला आपल्या सागरी किनाऱ्यावरील नैसर्गिक संसाधनाचा वापर करून आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करावा लागतो तसेच या महासागरीय क्षेत्रामधील उद्योगांचे योग्य गुंतवणूक,व्यवस्थापन करून विकास साधायचा असतो, कारण आज जगातील जवळजवळ 80 ते 90 टक्के व्यापार हा महासागरीय क्षेत्रातून होताना दिसतो त्यामुळे येथे रोजगार, अन्नसुरक्षितता, पर्यटन इत्यादी उद्योगांचा व्यवसाय विकास होणे गरजेचे आहे.आज जगातील प्रत्येक देशाच्या विकासाचे प्रगतीसाठी नवनवीन आव्हाने स्वीकारणे गरजेचे ठरत आहेत.

जगातील 3 अब्जाहून जास्त व्यक्ती या महासागरी उत्पन्नावर अवलंबून आहेत. महासागरातून रोजगाराचा, मत्स्यपालन, जलसंपत्ती तसेच किनारी प्रदेशातील पर्यटन हे एक उत्पन्नाचे मार्ग दिसतात. या महासागरी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न हे त्या देशातील सेवा क्षेत्रातील योगदान करतात. यावरून महासागरिक क्षेत्र हे अन्नसुरक्षा, दारिद्र्य निर्मूलन, रोजगार यासाठी मदत करते असे म्हणता येईल.

‘ब्लू इकॉनॉमी’ किंवा ‘नील अर्थव्यवस्था’ गेल्या काही वर्षांमध्ये उदयास येताना दिसत आहे.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, महासागरीय आर्थिक विकासात तेथील रोजगार, परिसंस्थेतील स्वास्थ्य टिकून ठेवण्यासाठी ‘ब्ल्यू इकॉनोमी किंवा नील अर्थव्यवस्था मदत करताना दिसते.

जागतिक महासागरीय किनारपट्टी वर असणारे विविध व्यवसाय आणि त्यासाठी समुद्राचा वापर करून सेवा क्षेत्रातील वाटा वाढवण्यात सागरी क्षेत्रातील मत्स्यपालन, सागरी वाहतूक, तसेच पर्यटन इत्यादी सेवा क्षेत्रांच्या विकासात नील अर्थव्यवस्था वाढवण्यार भर देण्यात आला आहे.

**भारतीय सागरी किनारपट्टीवरील व्यापार विकास:**

नील अर्थव्यवस्थेत महासागरीय संसाधने त्याचा पर्याप्त व शाश्वत वापर केला जातो त्यामुळे हि अर्थव्यवस्था देशाच्या आर्थिक विकासासाठी, संसाधनांचा शाश्वत वापरासाठी प्रोत्साहन देणारी असते. सागरी संसाधनांचा पर्याप्त वापर हा राष्ट्रापासून तर जागतिक स्तरावर करण्यासाठी सेवा क्षेत्रातील प्रगती साधता येणार आहे व या अर्थव्यवस्थेतंर्गत असणारे मत्स्यपालन व्यवसाय, समुद्री वाहतूक, सागरी पर्यटन पर्यावरण इत्यादींचा विकास करून त्यांचे क्षमता वाढवता येणार आहे.

**साहित्य आढावा:**

‘Ministry of external affairs
दुसरी IRO मंत्रालयीन ब्ल्यू इकॉनॉमी कॉन्फरन्स’

नील अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जरूर विचार करायचा झालं तर या अर्थव्यवस्थेच्या सारंगी विकासाद्वारे व्यापार पर्यटन गुंतवणूक सेवा क्षेत्र पायात सुविधांचा विकास सागरी विज्ञान तंत्रज्ञान शाश्वत मत्स्यपालन व सागरी पर्यावरणाच्या संरक्षणामध्ये वाढीव सहकार्याला चालना देऊन अधिक सहकार्य पूर्ण भविष्यकालीन अपेक्षा आहे.

Dr. U S Panda Scientist – E National Centre for Coastal Research Ministry of Earth Sciences, Chennai प्राथमिक संसाधने- पाणी, अन्न, ऊर्जा

दुय्यम संसाधने -खनिजे (खाण) वाहतूक, कचरा विल्हेवाट, जैवतंत्रज्ञान, पर्यटन, तृतीय क्षेत्र उद्योग,अंतरविज्ञान विकास,हवामान बदल ,अतिशोषण आणि कचरा विल्हेवाट ,सागरी सूरक्षा यांचा विचार

यात करण्यात आलेला आहे. तसेच या लिखाणात देखील त्यांनी खालील घटक नमुद केल्या आहेत.

- 7,517 किमी लांबीची किनारपट्टी
- 13 किनारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 13.36 % लोकसंख्या राहते
- मासळीचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक
- 2019 मध्ये 3.56 मेट्रिक टन मत्स्य उत्पादन (CMFRI 2020) ज्याचे मूल्य रु. अर्थव्यवस्थेत 65,000 कोटींचे महत्त्वपूर्ण योगदान
- 250 दशलक्षाहून अधिक लोकांना उपजीविकेचे साधन टिकवून ठेवते आणि प्रदान करते • जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्थाआहे.

'गीता मोहन'ब्लू इकॉनॉमिला चालना देण्यासाठी भारत - नॉर्व सामंजस्य करार

राजीव भाटिया blue diplomacy (19 Jan 2019)

या संशोधन पेपर मध्ये शाश्वत निळे अर्थव्यवस्थेतील भारतीय सेवा क्षेत्रातील योगदानाबद्दल महत्त्व अधोरेखित केले आहे.

- सागरी प्रदूषणाच्या भूमी-आधारित स्त्रोतांना प्रतिसाद देणे UNEP ग्लोबल प्रोग्राम ऑफ ॲक्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ द मरीन एन्व्हायर्नमेंट फॉर द प्रोटेक्शन ऑफ द लॅंड-प्रदूषण कमी करणे. ग्लोबल वेस्टवॉटर इनिशिएटिव्ह -सांडपाणी व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक, प्रभावी आणि शाश्वत कार्यक्रम सुरू करण्यासाठी भागीदारीचा पाया तयार करण्यात मदत करते.
- 'THE POTENTIAL OF THE BUE ECONOMY'

  Increasing Long-term Benefits of the Sustainable Use of Marine Resources for Small Island Developing States and Coastal Least Developed Countries

  World Bank Group. United Nations

  Source-The Journal of Income and Wealth Vol. 41, No. 1, January-June, 2019, pp. 68-92

  MEASURING THE BLUE ECONOMY OF INDIA

**गृहितके:**

1) भारताच्या सेवा क्षेत्रातील विकासात नील अर्थव्यवस्था भविष्यातील पाया म्हणून कार्य करील.
2) देशांतर्गत महासागरी उद्योग व्यापारपर्यंत तंत्रज्ञान हे सेवा क्षेत्रासाठी एक विकासाची चौकट या अर्थव्यवस्थेने निर्माण होईल.
3) सागरी क्षेत्राचे संवर्धन करत नील अर्थव्यवस्थेमुळे एक शाश्वत विकास तसेच मासेमारी सागरी वाहतुकीत तंत्रज्ञान वापरणे ,पायाभूत सुविधा विकासासाठी प्रयत्न होतील.
4) किनारे जवळच्या वसाहतीतील, तसेच पर्यावरण, तेथील समुदाय इत्यादी टिकून ठेवण्यात या अर्थव्यवस्थेद्वारे शक्य आहे.
5) आर्थिक विकासामध्ये खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या पुनर्प्राप्ती योग्य संसाधनांना या अर्थव्यवस्थेमुळे महत्त्व प्राप्त होईल.

**नील अर्थव्यवस्था / ब्ल्यू इकॉनोमी (Blue Economy) अर्थव्यवस्था म्हणजे काय?**

ज्या अर्थव्यवस्थेद्वारे सागरी किनारपट्टी वर असणारे विविध व्यवसाय सुरू राहण्यास पुनर्प्रक्रिया स्तोत्रांच्या मदतीने काय करता येईल ते पहाणे.

नील अर्थव्यवस्थेमध्ये अन्न सुरक्षितता, मत्स्यपालन व्यवसाय,जहाज बांधणी व्यवसाय ,पर्यटन व्यवसाय, तसेच शाश्वत विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी या दृष्टीने या संशोधन पेपर मध्ये ब्लू इकॉनोमीचा अभ्यास केला जाणार आहे.

'महासागरी व सागरी संसाधनांना किंवा स्रोतांना शाश्वतता देणे यातून नील अर्थव्यवस्था स्पष्ट होते.'

नील अर्थव्यवस्था म्हणजे महासागरीय परिसंस्थेचे जतन करून आर्थिक संधी वाढवून त्यावर सुधारित उपजीविके करिता सागरी संसाधनांचा पर्याप्त वापर होय.

सेंटर फॉर ब्ल्यू इकॉनोमी -नील अर्थव्यवस्था म्हणजे महासागरांचे एकूण योगदान महासागराने पर्यावरणीय तसेच स्थिरतेकडे लक्ष देणे होय.

**युनायटेड नेशन्सन व्याख्या:**

अनेक आर्थिक क्षेत्रातील धोरणे ठरविताना महासागर संसाधने टिकाऊ आहेत की नाही हे पहाणे,शाश्वत मत्स्यपालन ते शाश्वत पर्यावरणापर्यंत सागरी संसाधने यांचे शाश्वत व्यवस्थापन करणे होय.

शाश्वत विकासामधील 17 ध्येयातील 14वे ध्येय हे ‘पाण्याखालील जीवन’ याला महत्त्व देताना दिसत आहे. (सौजन्य -संयुक्त राष्ट्र)

प्रो गुंटर पॉली यांनी 3 NOV 2009 साली त्यांचा अहवाल क्लब ऑफ रोम मध्ये आपला निबंध सादर केला व त्याच्या मध्ये त्यांनी नीलअर्थव्यवस्था याबद्दल सांगितले होते त्यात त्यांनी The blue economy-10 years 100 innovations 100 million job म्हणजेच '10 वर्ष 100 नवकल्पना आणि 100 दशलक्ष रोजगार.'

प्रो.गुंटर यांच्या मते, शाश्वत विकासात समाजाकडे जी दुर्मिळता आहे किंवा जी कमतरता आहे ती भरून काढण्यासाठी स्थानिक ठिकाणचे मार्ग वापरणे ज्या ठिकाणी संसाधनाची विपुलता आहे देशाच्या अशा स्थानिक मार्गांचा वापर करणे आणि हे संसाधने वापरत असताना पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यांच्या मते,जगामध्ये रेड इकॉनोमी अयशस्वी ठरण्यात आली तसेच तिच्या मध्ये पर्यावरणाचा विचार केला नव्हता,यानंतर हरित (ग्रीन इकॉनोमी )पर्यावरण संतुलन ठेवल्यावर आधारित होती परंतु ती संक्रमणकालीन आहे, ती अर्थव्यवस्था आर्थिक विकासाला हातभार लावू शकत नाही. परंतु या दोन्ही अर्थव्यवस्थेच्या पेक्षा ब्ल्यू अर्थव्यवस्था अधिक विस्तारित आहे करण्यात प्रदूषण कमी होते तसेच या अर्थव्यवस्थेत प्रत्येक वापरली किंवा उरलेली गोष्ट पुन्हा पुपुनर्वापर करता येतो व शाश्वत वाढीसाठी ती एक महत्त्वाची अर्थव्यवस्था आहे तसेच देशातील सेवा क्षेत्रांमध्ये महासागरातील उद्योग व्यवस्थांचादेखील विकास होणे त्यासाठी नील अर्थव्यवस्था नक्कीच हातभार लावल्याचे दिसून येते.

**समस्येचे विधान:**

भारताच्या बाबतीत जर नील अर्थव्यवस्था समजून घ्यायची असेल तर भारतातील सेवा क्षेत्राची वाढ ही आर्थिक विकासात महत्त्वाचे कार्य करते.हे क्षेत्र भारतातील इतर दोन प्राथमिक व द्वितीय क्षेत्रांपैकीच एक आहे .यात पर्यटन, शिक्षण, बँकिंग, माहिती तंत्रज्ञान ,वाहतूक ,उद्योग व व्यवसाय यांचा समावेश होतो.परंतु आजच्या काळात एवढ्या क्षेत्रांवर अवलंबून राहता येत नाही.सेवा क्षेत्रांमध्ये नवनवीन उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी नील अर्थव्यवस्थेतील मत्सउद्योग ,सागरी वाहतूक, सागरी पर्यटन, समाविष्ट करावे लागतील.कारणा लोकसंख्येच्या वाढीमुळे असणारी

प्राथमिक क्षेत्र व द्वितीय क्षेत्र कमी पडत आहेत. यातील प्राथमिक क्षेत्रातील मत्स्यपालन हा व्यवसाय देखील तंत्रज्ञाने वाढवता येऊ शकतो.

प्राथमिक क्षेत्रातील मत्स्य व्यवसाय याचा देखील समावेश हा भारताचे सेवा क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे कारण फक्त मत्स्य व्यवसाय म्हणजे केवळ मासे पकडणे नव्हे तर त्यावर प्रक्रिया करणे, मासे साफ करून सुकविणे, पॅकिंग करणे तसेच त्यापासून वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन करणे.उत्पादन करताना विविध तंत्रज्ञान वापरावे लागते.

भारतीय अर्थव्यवस्था मुख्यतः प्राथमिक क्षेत्र व द्वितीय क्षेत्रावर अवलंबूनआहे .तृतीय क्षेत्राचा (सेवा क्षेत्र) विकास होण्यासाठी या विस्तृत पसरलेल्या किनारपट्टीजवळील संसाधनाचा उपयोग करून घेतला पाहिजे .

सागरी पर्यटन , सागरी वाहतूक किनार्यावर बंदरांचा विकास इ. व्यवसायामध्ये तंत्रज्ञान वापरून त्यावर प्रक्रिया करून त्यापासून नवनवीन रोजगार संधीही निर्माण होऊ शकते.

रोजगाराच्या प्रमाणात घट, त्याचबरोबर पावसावर अवलंबून असलेले कृषी क्षेत्र, वाढती लोकसंख्या तसेच अन्न सुरक्षितता इ. साठी फक्त अर्थव्यवस्थेतील प्राथमिक व द्वितीय क्षेत्र पूरकता प्रदान करत करू शकत नाही.आज सर्वच देशांचे लक्ष महासागरातील असलेल्या उद्योग व्यवसायांकडे केंद्र झाल्याचे दिसून येत आहे यामध्ये नेल अर्थव्यवस्था ही नेमकी भारतातील सेवा क्षेत्रामध्ये काय योगदान देईल हे पाहणे महत्त्वाचे आहे.

भारत सरकारचे नील अर्थव्यवस्थेतील उद्योगांसाठी असलेले धोरणात्मक व्यवस्थापन कसे आहे हे देखील पहावे लागेल. कारण भारतातील सेवा क्षेत्र हे देशातील सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर योगदान देत आहे तसेच महासागरी संसाधनातून येणारे उत्पन्न हे स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये 4% एवढे योगदान देत आहे.या संशोधन पेपर मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी नील अर्थव्यवस्था नवीन दिशा दाखवेल. तसेच, हे संशोधन सेवा क्षेत्रातील उद्योगांना, सरकारला आणि इतर नील अर्थव्यवस्थेच्या संभाव्यतेबद्दल समजण्यास करण्यास मदत करेल. उदा.समुद्री पर्यटन, समुद्री जैवतंत्रज्ञान, समुद्री ऊर्जा इत्यादी क्षेत्रांमध्ये सेवा क्षेत्रातील कंपन्यांसाठी मोठी वाढीची संधी संभाव्यता आहे. यासाठी सेवा क्षेत्रात संशोधन करणे गरजेचे आहे.

**संशोधन गरज व महत्त्व:**

या संशोधनाची गरज खालील कारणांमुळे आहे:

- महासागरी संसाधनातील विविध उद्योग क्षेत्रातील नवीन ज्ञान मिळवणे उदा. समुद्रातील खूप खोल समुद्रामध्ये असलेली विविध प्रकारची खनिजे, एकपेशीय प्राणी, सी फूड याबद्दल माहिती संपादन करणे
- महासागरीय व समुद्रामध्ये असलेले नॅचरल गॅस,तेल, तसेच नवीनतम ऊर्जेमध्ये पवन ऊर्जा, सौर लाटा ऊर्जा ,ज्वारीय ऊर्जा याबद्दल देखील विचार करणे,
- समुद्रिक क्षेत्रातील टुरिझम पर्यटन तसेच तेथील महत्त्वाचे बंदरांचा विकास इत्यादी समजून घेणे गरजेचे आहे.
- महासागरीय संसाधनामध्ये शाश्वत विकास तसेच शाश्वत पर्यावरण संवर्धन करणे .
- भारतातील मत्स्य व्यवसायाय उत्पादनातून रोजगार निर्मिती

सन 2030 पर्यंत कार्बन उत्सर्जनाची तीव्रता याची 30 ते 35 टक्के कमी करणे.महासागर शाश्वत विकास ब्लू इकॉनॉमीच्या विकासासोबतच पर्यावरणीय संरक्षण आणि सामाजिक समता या गोष्टींचा समतोल साधणे.

**संशोधनाचे उद्देश्य:**

भारतीय सेवा क्षेत्रात ब्लू इकॉनॉमीच्या योगदानाचे सखोल विश्लेषण करणे.

- ब्लू इकॉनॉमीच्या विकासामुळे अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या विकाससंधी यांची ओळख करून देणे.नील अर्थव्यवस्थेतील मत्सउद्योग सागरी वाहतूक, पर्यटन , बंदरांचा विकास इ.बाबत प्रभावी धोरणात्मक उपाययोजनांची शिफारस करणे.सेवा क्षेत्राकरिता नील अर्थव्यवस्था यामधील उद्योगांमध्ये गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्थांना ब्लू इकॉनॉमीच्या क्षेत्रात नवीन अभ्यासक्रम आणि संशोधन कार्यक्रम विकसित करण्यास मदत करणे.

**संशोधन पद्धती:**

या संशोधन विषयावर गुणात्मक माहिती या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना त्यामध्ये 'परिमाणात्मक विश्लेषण' करताना भारतीय सेवा क्षेत्रामध्ये मधील तसेच सकल देशांतर्गत उत्पादनामधील योगदानाची आकडेवारी घेऊन त्याचे परिणाम तपासणे. 'वर्णनात्मक संशोधन पद्धती' वापर करण्याचे त्यातील प्रत्येक घटकाची माहिती मिळवणे गरजेचे असणार आहे. या माहितीचे विश्लेषणात्मक परिमानाचे मापन करण्यात येईल.

सागरी क्षेत्रातील यशस्वी उद्योजक, व्यावसायिक यांची माहिती ,आकडेवारी गोळा करणे. समुद्री परिवहन,पर्यटन याविषयी माहिती गोळा करणे. यामधील संशोधन प्रतिमानामध्ये अर्थव्यवस्थेतील जे काही उपक्षेत्रे आहे उदा.मत्सपालन ,समुद्री वाहतूक, बंदरांचा विकास ,पर्यटन याबद्दल विद्यमान साहित्य वापरून प्रत्येक घटकाची माहिती गोळा करून वरील संशोधन पेपरमध्ये या घटकातील संबंध शोधणे .

सांख्यिकीय माहिती - सरकारी सांख्यिकीय आकडेवारी: केंद्रीय सांख्यिकी कार्यालय (CSO), अर्थ मंत्रालय, मत्स्यपालन मंत्रालय इत्यादींच्या वेबसाइटवरून GDP वाढ, रोजगार निर्मिती, मत्स्य उत्पादन, पर्यटन आकडेवारी इत्यादी गोळा करणे.विश्लेषणासाठी SPSS, Excel या संगणकीय पद्धतीचा वापर करण्यात येईल.आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल इत्यादींचा अभ्यास करण्यात येईल.

**भारतीय सेवा क्षेत्र आणि नील अर्थव्यवस्था यांचा एकत्रित विचार:**

**भारतीय मत्स्यपालन व्यवसाय:**

सन 1950 पासून आणि 2021-22 च्या अखेरीपर्यंत, राष्ट्रीय मत्स्य उत्पादनात 22 पट वाढ झाली आहे. गेल्या 9 वर्षांमध्ये, भारताचे वार्षिक मत्स्य उत्पादन 95.79 लाख टन (2013-14 अखेर) वरून 162.48 लाख टन (2021-22 च्या शेवटी) पर्यंत वाढले आहे. 66.69 लाख टन. पुढे, 2022-23 या वर्षासाठी राष्ट्रीय मत्स्य उत्पादन 174 लाख टन (तात्पुरते आकडे) अधिक होणे अपेक्षित आहे.
(स्त्रोत:-मत्स्यपालन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालय)

- ☐ जागतिक मत्स्योत्पादनात सुमारे 8% वाटा असलेला भारत हा तिसरा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश आहे: संदर्भ:(श्री रुपाला)
- ☐ भारताची सीफूड निर्यात 2013-14 पासून दुपटीने वाढली आहे आणि ती रु. 2022-23 या आर्थिक वर्षात 63,969.14 कोटी: संदर्भ केंद्रीय मंत्री

**1. मत्स्य प्रक्रिया उद्योग:**

मत्स्य प्रक्रिया उद्योगामध्ये मत्स्य उत्पादनांचे प्रक्रिया करून त्यांची विक्री केली जाते. ब्लू इकॉनॉमीच्या दृष्टिकोनातून, मत्स्य प्रक्रिया उद्योगाला

अधिक सुलभ आणि तंत्रज्ञान युक्त करण्याचा प्रयत्न केला जातो.

सन 2017- 18 मध्ये भारतात होणाऱ्या एकूण निर्यात सुमारे 10%आणि कृषी निर्यातीपैकी सुमारे 20 टक्के निर्यातीमध्ये मासळी व्यवसाय होता. मत्स्यपालनापासून मिळणारे उत्पन्न भारताच्या जीडीपी मध्ये सुमारे एक टक्के योगदान देते भारतात सुमारे 28 दशलक्ष लोकांनी रोजगाराच्या संधी मासेमारी व्यवसायातून प्राप्त होतात.

तक्ता १: भारतातील किनारपट्टीवरील राज्यांमधील उदरनिर्वाहासाठी मत्स्यपालनावर अवलंबून असलेली लोकसंख्या (ब्लू इकॉनॉमी वर्किंग ग्रुपच्या अहवालानुसार, पंतप्रधान २०२० ची आर्थिक सल्लागार परिषद)

| राज्य | मासेमारी गावे | मासेमारी कुटुंबे | मच्छीमार लोकसंख्या |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | 555 (16.2) | 163,427 (18.7) | 605,428 (14.9) |
| गुजरात | 247 (7.2) | 62,231 (7.1) | 336,181 (8.3) |
| तामिळनाडू | 573 (16.7) | 192,697 (22.0) | 802,912 (19.8) |
| ओडिशा | 813 (23.7) | 114,238 (13.1) | 605,514 (14.9) |
| कर्नाटक | 144 (4.2) | 30,713 (3.5) | 167,429 (4.1) |
| केरळा | 222 (6.5) | 118,937 (13.6) | 610,165 (15.0) |
| गोवा | 39 (1.1) | 2,189 (0.3) | 10,545 (0.3) |
| महाराष्ट्र | 456 (13.3) | 81,492 (9.3) | 386,259 (9.5) |
| पश्चिम बंगाल | 188 (5.5) | 76,981 (8.8) | 380,138 (9.4) |

युनायटेड नेशनने प्रथम 2012 मध्ये एका परिषदेत 'ब्ल्यू इकॉनोमी' सादर केली आणि त्यासाठी शाश्वत व्यवस्थापनाचा उल्लेख केला ज्यामुळे सागरी परिसंस्था ही निरोगी राहून त्यातून अधिकतम उत्पादनक्षमता निर्माण होईल कारण या इकॉनॉमिनी आर्थिक वाढ ,सामाजिक समावेशन आणि उपजिविकेचे संरक्षण तसेच सुधारणेला प्रोत्साहन दिले आहे.

भारतातील किनारपट्टीवरील राज्यांमधील उदरनिर्वाहासाठी मत्स्यपालनावर अवलंबून असलेली लोकसंख्या (ब्लू इकॉनॉमी वर्किंग ग्रुपच्या अहवालानुसार, पंतप्रधान 2020 ची आर्थिक सल्लागार परिषद)

**State- wise Per Capita Fish Consumption (2022-23)**

The top three major fish consuming States/UT s for 2022-23 are A & N Islands, Lakshadweep, and Tripura.

**Table 3.2: State-wise Per Capita Fish Consumption - 2022-23**

| S.N. | States/UTs | Yearly Fish Consumption (Per capita/kg) |
|---|---|---|
| 1 | Andhra Pradesh | 9.93 |
| 2 | Arunachal Pradesh | 5.03 |
| 3 | Assam | 13.06 |
| 4 | Bihar | 6.64 |
| 5 | Chhattisgarh | 17.5 |
| 6 | Goa | 0 |
| 7 | Gujarat | 0.00 |
| 8 | Haryana | 0.3 |
| 9 | Himachal Pradesh | 14 |
| 10 | Jharkhand | 12.12 |
| 11 | Karnataka | 20.72 |
| 12 | Kerala | 20.65 |
| 13 | Madhya Pradesh | 6.57 |
| 14 | Maharashtra | 2.47 |
| 15 | Manipur | 18.25 |
| 16 | Meghalaya | 10.74 |
| 17 | Mizoram | 4.43 |
| 18 | Nagaland | 6.13 |
| 19 | Odisha | 17.73 |
| 20 | Punjab | 0 |
| 21 | Rajasthan | 0.9 |
| 22 | Sikkim | 1.72 |
| 23 | Tamil Nadu | 10.83 |
| 24 | Telangana | 8.79 |
| 25 | Tripura | 27.62 |
| 26 | Uttarakhand | 1.35 |
| 27 | Uttar Pradesh | 12.59 |
| 28 | West Bengal | 15.11 |
| 29 | A & N Islands | 114 |
| 30 | Chandigarh | 0 |
| 31 | Daman and Diu and Dadra &Nagar Haveli | 11.15 |
| 32 | Delhi | 0.21 |
| 33 | Jammu & Kashmir | 6 |
| 34 | Ladakh | 0.19 |
| 35 | Lakshadweep | 89 |
| 36 | Puducherry | 15.95 |

Source : Department of Fisheries, State Government\UT Administration

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना याद्वारे 2024-25 पर्यंत वीस हजार कोटी गुंतवणूक पुढील पाच वर्षासाठी केली आहे (नौवहन मंत्रालयवार्षिक आढावा- 2018 )

**जहाज बांधणी व्यवसाय व ब्लू इकॉनोमी:**

जहाज बांधणी: देशांतर्गत, जहाज बांधणीला प्रोत्साहन देण्याकरिता, भारत सरकारने 4000 कोटीचे अर्थसहाय्याचे धोरण 2016 ते 2026 अशा दहा वर्षाकरिता उपलब्ध करून दिले आहे. या धोरणाअंतर्गत, भारतीय शिपयार्डना कॉन्ट्रक्ट प्राईस च्या 20 टक्के पेक्षा कमी किंवा ‘ फेयर प्राइस‘ किंवा याच्याद्वारे निर्मित( व्हेसेल्स) जहाजांची पावतीच्या बदल्यात आर्थिक सहाय्य दिले जाते. आर्थिक सहाय्याचा दर तीन वर्षानी 3 टक्के कमी करण्यात येईल. निळ्या अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या पैलू मध्ये कोस्टल शिपिंगचा हिस्सा 2035 पर्यंत 33% टक्के वाढण्याची क्षमता आहे त्यामुळे देशातील तेल व वायूचा पुरवठा समुद्र द्वारे केला जाऊ शकतो ज्यामुळे हिंदी महासागराचा प्रदेश भारताच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल व हे 2025 जास्त क्षमतेने वाढण्याची अपेक्षा आहे.तसेच कार्बन उत्सर्जनाच्या बाबतीत देखील झाले आणि बंदरी सुविधा मधून हे होणार उत्सर्जन निळ्या अर्थव्यवस्थेमुळे कमी करण्यात येईल. (जहाजबांधणी मंत्रालय)

सागरमाला प्रकल्प सागरमाला प्रकल्प अंतर्गत 650 पेक्षा जास्त प्रकल्प 8.8 लाख कोटीच्या तरतुदीने सध्या आहेत. यापैकी 0.14 लाख कोटींची 89 प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे 4.32 लाख कोटींचे 445 प्रकल्प अंमलबजावणी व विकासाच्या टप्प्या अंतर्गत आहेतत्याबरोबर बंधाराचे विकासामध्ये कौशल्याधरित विकास त्याबरोबर पर्यटन बंदरांना एकमेकांशी जोडणे इत्यादी काम या प्रकल्पातून होणार आहे. भारतातील सेवा क्षेत्रामध्ये या बंदरांच्या विकासाला महत्व आहे. कारण बंदरांच्या विकासामुळे रोजगार निर्मिती , आर्थिक विकास होऊन चालणे उद्योगांना मिळत आहे आणि हे सर्व होण्यासाठी नील अर्थव्यवस्था व्यवस्था मदत करताना दिसत आहे.

नील अर्थव्यवस्थेतून सेवा क्षेत्रामधील विकासात तटीयजहाज बांधणीचा हिस्सा 2035 पर्यंत 30 टक्के पर्यंत वाढण्याची शक्यता आहे

बंदर विकासात औद्योगीकरण करत असताना त्यामध्ये (SEZ)विशेष आर्थिक क्षेत्राचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. यात गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र प्रदेश या प्रदेशात प्रथमदर्शनी प्रकल्प तयार करण्यात येतील.

तक्ता २: भारतातील प्रमुख असलेल्या बंदरांमध्ये रोजगार

| राज्य / केंद्रशासित प्रदेश | 2003 | 2008 | 2014 | 2019 |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | 109 | 69 | 1195 | 2278 |
| तामिळनाडू | 110 | 62 | 35 | 35 |
| पॉंडिचेरी | 79 | 33 | 485 | 245 |
| कर्नाटक | 99 | 55 | 124 | 53 |
| केरळा | 316 | 191 | 683 | 262 |
| महाराष्ट्र | 173 | 153 | 117 | 53 |
| गुजरात | 2662 | 1718 | 1723 | 1056 |
| गोवा | 166 | 146 | 144 | 136 |
| A&N बेटे | 477 | 452 | 641 | 623 |
| लक्षद्वीप | 217 | - | 111 | - |
| दमण आणि दीव | 22 | 22 | 10 | 6 |
| ओडिशा | - | 118 | 759 | 361 |
| एकूण | 4430 | 3019 | 5097 | 5108 |

स्रोत: जहाज वाहतूक, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय

**सागरी पर्यटन व्यवसाय व ब्लू इकॉनोमी:**

भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये इकॉनोमी भविष्यातील विकासासास एक भरभक्कम कार्य करेल ज्या देशांच्या बेटांचा समावेश असेल त्या बेट भागात पर्यावरण पर्यटन विकसित होईल त्याचप्रमाणे समुद्रकिनाऱ्यावरील पुनरुत्पादन पर्यटनामुळे रोजगाराच्या नवीन संधी तेथील समुदायांना मिळून भारतासारखे विकसनशील देशात विकासाचे स्त्रोत निर्माण होईल.

निल अर्थव्यवस्थेमुळे महासागरीय किनारपट्टीवरील विद्यमान व्यवसायांना तसेच नवीन उदयोन्मुख क्षेत्राच्या विकासावर देखील लक्ष केंद्रित होईल जे वीस वर्षांपूर्वी अस्तित्वात नव्हते.उदाहरणार्थ सागरी ऊर्जा, जैवतंत्रज्ञान इत्यादींचे शिक्षण प्रशिक्षण व रोजगारासाठी क्षमता व अक्षय ऊर्जेसाठी महत्त्वाची ठरत आहेत. पवन ऊर्जा, जलविद्युत तसेच ज्वारीय ऊर्जा यासारखे पर्यायी ऊर्जा स्त्रोत सागरी वातावरणातून मिळून त्यांचा विकसनशील देशांना नक्कीच फायदा नील अर्थव्यवस्थेमुळे होत आहे कारण यातून ह कार्बनीकरण कमी होत आहे.

आज जागतिक विजेच्या मागणीच्या 18% पेक्षा जास्त उत्पादन करण्याची क्षमता पवन ऊर्जात दिसून येते.

आर्थिक विकास: सागरी पर्यटन हा अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला चालना देतो. पर्यटकांच्या येण्याने रेस्टॉरंट्स, आणि इतर अनेक व्यवसाय सुरू होतात.. यामुळे स्थानिक भागातील किनारपट्टीवर समुदायातील रोजगार वाढतो आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होते. पर्यटकांना पारंपरिक कला, संस्कृती आणि खाद्यपदार्थ अनुभवण्याची संधी मिळते, ज्यामुळे स्थानिक उत्पादनांना बाजार मिळतो. प्रत्येक महासागर क्षेत्रातील समुद्रकिनारी त्या ठिकाणचे असणारे हवामान आणि भौगोलिक परिस्थितीमुळे तेथे पर्यटनाच्या देखील विविधता आढळते.

सागरी पर्यटनाचे काही उदाहरण:स्नॉर्कलिंग आणि डायविंगबीच पर्यटन: बीच पर्यटन क्रूझ टूरमत्स्यपालन पर्यटन: भारतातील अंदमान निकोबार बेटे, केरळ, गोवा, गुजरात येथे पर्यटनाचा व्यवसाय होताना दिसतो यामुळे परकीय चलनात वाढ, रोजगार संधी या स्थानिक लोकांना मिळत जातात.

**समुद्री परिवहन:** समुद्री पर्यावरण परिवहन हे नील अर्थव्यवस्थेचा पाया आहे जगातील जवळजवळ 90 टक्के व्यापार हा महासागरातून होत असतो. समुद्री परिवहन हे समुद्र क्षेत्रातील उत्पादनाची वाहतूक करण्यासाठी सर्वात सुलभ पर्यावरण पूरक मार्ग आहे. याचा फायदा सेवा क्षेत्रामध्ये होताना दिसतो आणि यासाठी निल अर्थव्यवस्था मदत करत असते व याद्वारे देशातील सेवा क्षेत्राचा देखील विकास होत असतो. भारताला लांब विस्तृत समुद्रकिनारा लाभलेला आहे. तसेच या समुद्राच्या ठिकाणी विपुल ,सधन नैसर्गिक संसाधन दिसून येत आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी असणारी वाहतूक देखील समुद्रमार्गे होत असते.

आंतरराष्ट्रीय व्यापारात कच्चे तेलासाठी मोठमोठी जहाजे हजारो टन उत्पादन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करतात. महासागरीय क्षेत्राचा वाहतुकीचा जर विकास झाला तर यातून खूप मोठ्या प्रमाणात फायदा अर्थव्यवस्थेला होतो.यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सेवा क्षेत्र जे आहे त्यामध्ये वाढ होताना दिसून येते.समुद्रातून खनिजे , गॅस इत्यादी काढून ते समुद्रामार्गे शुद्धीकरण प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इतर भागात नेले जाते. त्यामुळे आपोआपच महासागराचा सेवा क्षेत्रामध्ये समावेश होतो. भारतातील सेवा क्षेत्रामध्ये नील अर्थव्यवस्था महत्त्वाचे कार्य पार

पाडताना काही आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागते.तंत्रज्ञान अभाव प्रभावी गुंतवणुकीचा अभाव

नील अर्थव्यवस्था ही महासागरीय क्षेत्रावर आधारलेली आहे. समुद्री भागातील सर्व क्रिया प्रक्रिया नील अर्थव्यवस्थेत घडत असतात. त्यामुळे सागराच्या आत जे काही खनिजे नॅचरल गॅस इत्यादी बाहेर काढण्यासाठी खूप मोठ्या तंत्रज्ञाने प्रशिक्षणाची गरज आहे. व भारतामध्ये यातील तंत्रज्ञानाच्या अभावाने ,कौशल्यपूर्ण शिक्षण न मिळाल्यामुळे हा भाग सुप्तच राहत आहे. हे मोठे आव्हान भारतीय सेवा क्षेत्रांमध्ये दिसून येते.

शाश्वत पर्यावरण -नील अर्थव्यवस्थेत महासागरातील संसाधनांची पर्याप्त वापर करत असताना पर्यावरण संवर्धन करणे देखील गरजेचे आहे. पर्यावरण शाश्वत पर्यावरण विकास व्हायला पाहिजे.

महासागरातील अक्षय उर्जा- पवन ऊर्जा , समुद्री लाटातील ऊर्जा, ज्वारभाटिय ऊर्जा या सर्वांच्या स्त्रोतांचा विकास होणे गरजेचे आहे. सरकारकडून याबाबतीत योग्य नियमन करणे, योग्य नियमांवर धोरणे आखणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवून या महासागरातील संसाधनांचा वापर करण्यात आला पाहिजे.

जैवविविधता संवर्धन –महासागरातील जैवविविधता संवर्धन करणे सागरी वाहतुकीसाठी नवनवीन तंत्रज्ञान वापरणे त्याचप्रमाणे सागरी किनाऱ्यावरील अति मासेमारी टाळणे तसेच पर्यटनाकडे देखील सरकारने योग्य लक्ष केंद्रित करणे इत्यादी आव्हाने यांनी अर्थव्यवस्थेवरून सेवा क्षेत्रामध्ये दिसून येत आहेत.

**जी-20 भारत आणि नील अर्थव्यवस्था:**

जी 20 मध्ये सन 2022-23 चे अध्यक्षपद भारताने भूषविलेले आहे त्यानंतर नील अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आल्याची दिसत आहे. सद्यस्थितीवर जी-20 राष्ट्रगटाच्या माध्यमातून संशोधन केले जाणार आहे. बंगलोर मधील जी 20 बैठकीत जलवायू स्थिरता, भूमीचे क्षरण रोखणे, जैवविविधता संवर्धन करण्यासाठी नील अर्थव्यवस्थेवर भर दिला आहे.2019 चा अर्थसंकल्पात भारत सरकारने 1.0 ब्लू इकॉनोमी वर प्रकाश टाकला तसेच आता 2.0 ब्ल्यू इकॉनोमी मध्ये महासागरांतर्गत वेगवेगळ्या होणाऱ्या गतीविधींना महत्त्व दिले जाणार आहे सन 2024 मधील अर्थसंकल्पात नील अर्थव्यवस्थेचा विचार केलेला आहे. भारताला 7,517 किमी लांबीची किनारपट्टी आहे ज्यात नऊ किनारी राज्ये आणि 1382 बेटे आहेत. किनारपट्टीची अर्थव्यवस्था 4 दशलक्षाहून अधिक मच्छिमार आणि इतर किनारी समुदाय टिकवून ठेवते. या विशाल सागरी हितसंबंधांसह, भारतातील ब्लू इकॉनॉमीचा देशाच्या आर्थिक वाढीशी महत्त्वाचा संबंध आहे. केंद्रीयजल आणि वायू विकास मंत्री भूपेंद्र यादव यांनी सांगितले की, बंगरूळ मध्ये होणारी जी20 बैठकीत जलवायू स्थिरता यात भूमीचे क्षरण रोखणे,जैवविविधता संवर्धन यासाठी नील अर्थव्यवस्था वाढवण्यार भर देण्यात येणार आहे.SDG-14 ध्येयासाठी (समुद्राखालील जीवन) याद्वारे नील अर्थव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट केले.

**निष्कर्ष:**

आर्थिकदृष्ट्या विकास होऊन लोकांचे राहणीमान उंचावणे, तसेच त्यांच्या अन्नसुरक्षा आणि रोजगार निर्मिती यामुळे सागरी वसाहतींचे आरोग्य संवर्धन करणे शक्य होणार आहे. समुद्रातील मासेमारी, तसेच खोल सागरातून खनिजे, खनिज तेल ,नैसर्गिक वायू मिळवणे व अपारंपरिक ऊर्जेसाठी भविष्यात निरार्थ्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे.पृथ्वीच्या पर्यावरणाचे संरक्षण आर्थिक विकासासाठी, संपत्तीसाठी समृद्धीसाठी वापर करणे . सागरी जीवसृष्टीचे संरक्षण व संवर्धन यांनाही महत्त्व देण्यात आहे.शाश्वत पुनरुत्पादन पर्यटनामुळे समुद्र किनारपट्टीवरील अनेक राष्ट्रांसाठीची

आर्थिक उत्पन्न मिळण्याचे सुनिश्चित होईल. महासागर समुद्र आणि समुद्रासाठी संबंधित आर्थिक प्रक्रिया म्हणजे नील अर्थव्यवस्था होय. यावरून पुढील काही वर्षांमध्ये नील अर्थव्यवस्था कार्यक्षम होणार आहे.सागरी किनाऱ्यावरील मत्स्यव्यवसायातून अन्न सुरक्षितता निर्माण होते.2030 पर्यंत कार्बन उत्सर्जनाची तीव्रता आहे30 ते 35 टक्के नील अर्थव्यवस्थेमुळे कमी होणार आहे.

**शिफारशी:**

- भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचा नील अर्थवस्थेचा परिणामकारक वापर करणे.

  भारत देशातील सेवा क्षेत्रामध्ये सागरीय विकास करतांना गुंतवणूक व रोजगार लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे भारताने सेवा क्षेत्रामध्ये मत्स्य पालन व्यवसायामध्ये ब्लू इकॉनॉमीचे योगदान असणे आवश्यक आहे. भारताने महासागरीय सेवा क्षेत्रातून जलीय अन्नसुरक्षितता वाढविणे
- जागतिक स्तरावर दरवर्षी 350 दशलक्ष म्हणून अधिक लोक जगाच्या किनारपट्टीवरून प्रवास करतात. त्यामुळे पर्यटन क्षेत्राचा देखील वार्षिक मूल्य हे 36 अब्ज कोटी आहे किनारपट्टी व सर्व सागरी पर्यटन हे जागतिक पर्यटनाच्या अंदाजे 50% आहे. भारताने सेवा क्षेत्र सागरी पर्यटन विकासामध्ये भरीव धोरणे आखणे.
- जागतिक स्तरावर समुद्रातील वारे व त्यापासून निर्माण होणारी ऊर्जा तिची क्षमता देखील मोठी आहे व जागतिक वीज निर्मिती पैकी ऊर्जा निर्मितीदेखील 0.3% एवढे होते. त्यामुळे भारताने सेवा क्षेत्रारिता आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अक्षय उर्जा वाढविणे.
- भारताने निर्यातीला चालना देण्यासाठी देखील महासागर आधारित उद्योग व सागरी वाहतूक यामध्ये नील अर्थव्यवस्थेचा समावेश करणे.
- भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सागरी व्यवसायावर अवलंबून असलेल्या जनसमुदायास उदनिर्वाह करण्याकरिता आर्थिक संस्थाची उभारणी करुन गुंतवणूक व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यास मोठयाप्रमाणात वाव आहे.

**समारोप:**

भारतासाठी ब्लू इकॉनॉमी म्हणजे महासागर आणि सागरी परिसंस्थांशी संबंधित अनेक आर्थिक संधी, जी उपजीविका निर्माण करण्यात आणि टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कोविड 19 साथीच्या रोगाचा एक मोठा परिणाम म्हणजे उपजीविकेचे नुकसान आणि रोजगाराच्या संधी कमी होणे. लाखो नोकऱ्या उपलब्ध करून देणारी आणि अधिकच्या संधी धारण करणारी काही प्रमुख क्षेत्रे म्हणजे मत्स्यपालन, जहाजबांधणी, पर्यटन, खोल समुद्रातील खाणकाम, ऑफशोअर ऊर्जा संसाधने, सागरी संशोधन, महासागर संवर्धन आणि महासागर विज्ञान यासह महासागर आधारित क्षेत्रे होय.

**संदर्भ सूची:**

1) Department of Fisheries Ministry of fisheries animal husbandryand dariy Government of India New Delhi (November 2023)
2) Ocean Governance and the Blue Economy: A Guide to the New Ocean Economy by Kristina Gjerde
3) The Journal of Income and Wealth Vol. 41, No. 1, January-June, 2019, pp. 68-92

4) Posted On: 13 DEC 2018 6:17PM by PIB Mumbai
5) नवी दिल्ली, 13 डिसेंबर 2018 UN
6) THE POTENTIAL OF THE BLUE ECONOMY
7) Increasing Long-term Benefits of the Sustainable Use of Marine Resources for Small Island Developing States and Coastal Least Developed Countries.
8) Blue Economy Blue Economy : : Opportunities and sustainable concer
9) अर्थ मंत्रालय 2022-23 माहिती प्रसारण
10) National oceanic and atmosphere administration(NOAA)

**Website:**

1) lokmat.com2des2017
2) Loksatta.com 12 March 2023
3) hello maharashtra.in 5 feb2023
4) marathi abp live.com

**वर्तमानपत्रे:**

1) लोकमत लेख 2018
2) नवभारत समाचार पत्र लेख

**मासिके:**

1) Economic survey